**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI**

**Syllabus Prescribed under Choice based Credit System 2022-2023**

**Faculty : Humanities**

Programme : Bachelor of Arts (B. A.)

Subject/ Course - Sanskrit Literature

**Part A**

**Preamble:-**

संस्कृत भाषेतील साहित्य विश्वातील अत्यंत प्रगल्भ साहित्य म्हणून सर्वमान्य आहे.

गद्य, पद्य, नाटक,खंडकाव्य, महाकाव्य, चंपूकाव्य, शतककाव्य अशा विविध अंगाने हे साहित्य संपन्न आहे.

काव्यात्मक साहित्या सोबतच दर्शन आणि वैज्ञानिक संशोधन आणि देखील हे साहित्य संपन्न आहे.

यातील प्राधान्याने काव्य आणि नाट्य यांचा सखोल परिचय आणि अन्य अंगाचा परिचय संस्कृत विषयाच्या प्रत्येक अभ्यासकाला असायलाच हवा या दृष्टीने हा अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला आहे.

**Program Outcome (PO's):-**

१) प्रत्येक वर्षी संस्कृत भाषेतील एका नाटकाच्या अभ्यासाच्या माध्यमातून नाट्य शास्त्राचा विविधांगी अभ्यास करणे.

२) नीतिशतकम् या वैशिष्ट्यपूर्ण काव्याच्या आधारे संस्कृत सुभाषित वाङ्मय, त्याद्वारे संस्कृत भाषेची विविध वैशिष्ट्ये समजून घेऊन नैतिक मूल्यांचे प्रतिष्ठापन करणे.

३) द्वितीय आणि तृतीय वर्षात मेघदूतम् च्या माध्यमातून खंड काव्याचा अभ्यास करणे.

४) लघुसिद्धान्तकौमुदी या ग्रंथाच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी संस्कृत व्याकरणाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे.

५) प्रथम वर्षात पंच महाकाव्य द्वितीय वर्षात षट्दर्शन आणि अंतिम वर्षात संस्कृत विषयातील वैज्ञानिक संशोधकांचा परिचय करून देणे.

६) सर्व अभ्यासक्रम घटकांचे सूक्ष्म अध्ययन करून वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे देता येणे.

७) समाविष्ट कौशल्याधारित अभ्यासक्रमांच्या द्वारे कौशल्य प्राप्त करणे

ही या अभ्यासक्रमाची व्यापक उद्दिष्टे असतील.

**Program Specific Outcome (PSO's):-**

१) अभ्यासक्रमातील नाटक किंवा काव्यामध्ये असणाऱ्या श्लोकांचा अनुवाद करता येईल.

२) अभ्यासक्रमातील नाटक किंवा काव्यातील महत्त्वपूर्ण वचनांचे संदर्भासह स्पष्टीकरण करता येईल.

३) नाटकातील महत्त्वपूर्ण घटनांचे रसग्रहण करून सारांश सादर करता येईल.

४) काव्यातील विविध श्लोकांचे तौलनिक अध्ययन करून रसग्रहणात्मक सारांश सादर करता येईल.

५) नाटकातील पात्रांचे व्यक्तिमत्व चित्रण साकारता येईल.

६) नाटककाराचे जीवन, त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे योगदान, त्यांची शैली याबाबत विवेचन करता येईल.

७) व्याकरणातील सूत्रांचे सोदाहरण स्पष्टीकरण करता येईल.

८) पंचमहाकाव्य, षट्दर्शन, वैज्ञानिक संशोधक या विषयावर विस्तृत वाचन करून सारांश सादर करता येईल.

९) कौशल्य आधारित अभ्यासक्रमातील कौशल्ये अंगीकृत करता येतील

**Employability Potential of the Programme:**

**(संस्कृत विषयात रोजगाराच्या संधी)**

संस्कृत भाषा केवळ पारंपारिक भाषा आहे त्यामाध्यमातून फारतर कर्मकांड करणारा पुरोहित वर्ग तयार होतो अशीच अनेकांची धारणा आहे.

मात्र ही धारणा केवळ गैरसमजावर आधारित असून संस्कृत भाषेच्या अभ्यासकांना खालील माध्यमातून रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध आहेत.

१) **अध्यापक / प्राध्यापक** - सध्याच्या शिक्षण पद्धतीत के.जी. पासून पी.जी. पर्यंत प्रत्येक स्तरावर संस्कृत शिक्षण निवडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत असल्याने असंख्य संस्थांमध्ये शिक्षक-प्राध्यापक ही रोजगाराची प्रधान संधी आहे.

२) **संशोधक** - शासकीय तथा निमशासकीय स्तरावरील असंख्य संस्थांमध्ये सातत्याने सुरू असणाऱ्या संशोधन कार्यात संस्कृतच्या विद्यार्थ्याला असंख्य संधी आहेत.

३) **अकादमी** - विविध राज्य शासनांच्या द्वारे स्थापित संस्कृत आणि संस्कृतीशी संबंधित विविध अकादमीमध्ये कायमस्वरूपी अनेक संधी आहेत.

४) **हस्तलिखित संशोधन** - आजही भारतात आणि जगात अभ्यास न झालेल्या अगणित हस्तलिखितांच्या अभ्यासासाठी अनेक संस्कृत अभ्यासकांची नियुक्ती केली जाते. त्यांच्या संशोधन आणि प्रकाशन क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत.

५) **पुरातत्वविद्या** - पुरातत्व विभागात शिलालेखा पासून शिल्पशास्त्रापर्यंत पर्यंत, ताम्रपत्र इत्यादी वाचन क्षेत्रात देखील मोठी संधी आहे

६) **स्पर्धा परीक्षा / प्रशासकीय सेवा** - विविध स्पर्धा परीक्षांमध्ये संस्कृत हा स्वतंत्र विषय घेऊन अभ्यास करण्याची सुविधा आहे. त्याचप्रमाणे सामान्य ज्ञानाशी संबंधित अनेक प्रश्न संस्कृत तथा संस्कृती संबंधी विचारले जातात.

७) **सेना धर्मगुरू** - भारतीय सेनेच्या विविध स्तरांवर असणाऱ्या मंदिरांमध्ये आणि सैनिकांना मार्गदर्शन करण्यासाठी सेना धर्मगुरू पदावर मोठ्या प्रमाणात संधी असते.

८) **ज्योतिष सल्लागार** - सामान्य माणसाच्या अत्यंत जिव्हाळ्याचा असणाऱ्या या विषयात अगणित संधी आहेत.

९) **वास्तुशास्त्र सल्लागार** - संस्कृतच्या प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करून जनमानसात नव्याने आकर्षण असणाऱ्या या विषयात भरपूर संधी आहेत.

१०) **योगाचार्य** - जागतिक पातळीवर योग या विषयात असणाऱ्या आकर्षणाचा विचार करता संस्कृतच्या अभ्यासातून या विषयात देखील असंख्य संधी आहेत.

११) **आयुर्वेदाचार्य** - प्राचीन संस्कृत ग्रंथांचा अभ्यास आयुर्वेदिक दृष्टीने केल्यास सल्लागार या पासून त्या क्षेत्रातील संशोधना पर्यंत आणि औषधी निर्माण क्षेत्रात असंख्य संधी उपलब्ध आहेत.

१२) **लेखन क्षेत्र** - संस्कृत साहित्याचा अभ्यास करून वृत्तपत्र लेखन, ग्रंथलेखन, कथालेखन अशा विविध दृष्टीने रोजगाराची संधी उपलब्ध होतात.

१३) **संपादकीय क्षेत्र** - वृत्तपत्र तथा इलेक्ट्रोनिक मिडिया मध्ये सुद्धा संपादन, मुद्रितशोधन, शीर्षक निर्मिती अशा विविध संधी आहेत.

१४) **अनुवादक** - प्राचीन अनुपलब्ध संस्कृत ग्रंथांचे विविध भाषांमध्ये अनुवाद करण्याची फार मोठी संधी नवीन काळात उपलब्ध आहे.

१५) **संगणकीय संस्कृतम्** - संगणकाला संस्कृत भाषा सर्वाधिक सुसंगत आहे हे आता जागतिक पातळीवर मान्य झाले आहे. ह्या विषयात तंत्रज्ञान जाणणाऱ्या संस्कृत अभ्यासकाला अनेक संधी उपलब्ध आहेत.

१६) **कथा वाचक** - मानसिक शांतीसाठी धार्मिक-अध्यात्मिक कथा श्रवण करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस सातत्याने वाढत आहे. या विषयात पूर्ण कालिक अनेक संधी उपलब्ध आहेत.

१७) **प्रेरक वक्ता** - सध्याच्या ताण-तणावाच्या काळात प्रेरक वक्ता (Motivational speaker) एक मोठा व्यवसाय होत आहे. या विषयातील अफाट संस्कृत साहित्यामुळे संस्कृतच्या विद्यार्थ्याला या क्षेत्रात प्रचंड संधी आहे.

१८) **वृत्तनिवेदक** - दूरदर्शन, आकाशवाणी व संस्कृत कार्यक्रमात तथा अन्य वाहिन्यांवर देखील शुद्ध सादरीकरणामुळे संस्कृत अभ्यासकास प्राधान्य दिले जाते.

१९) **नाट्य क्षेत्र** - विविध राज्य सरकारांच्या द्वारे तथा सामाजिक संस्थांद्वारे संस्कृत नाट्य स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यात लेखका पासून अभिनेत्यांपर्यंत विविध संधी आहेत.

२०) **भाषाविज्ञान** - जागतिक पातळीवर भाषा विज्ञानाचा अभ्यास सातत्याने वृद्धिंगत होत असल्याने विविध भाषांच्या अभ्यासात संस्कृतचे अधिष्ठान लक्षात घेता या क्षेत्रात देखील अनेक संधी आहेत.

२१) **मल्टिमीडिया** - या नवीन क्षेत्रात विविध पद्धतीने प्राचीन संस्कृत ज्ञानाला अभिनव पद्धतीने सादर करण्यासाठी विविधांगी संधी उपलब्ध आहेत.

२२) **युट्युब** - विविध विषयांवरील ज्ञानवर्धक आणि मनोरंजक व्हिडिओंना प्रचंड मागणी आहे. विशेष प्रसिद्धी नंतर युट्युब कडूनच अर्थार्जनही संभव असते.

२३) **सशुल्क अभ्यासक्रम** - या नवीन तंत्रज्ञानावर अनेक लोक प्राचीन संस्कृत ग्रंथांवर आधारित सशुल्क अभ्यासक्रम तयार करीत आहेत. स्वयंरोजगाराची फार मोठी संधी आहे.

२४) **संस्कार वर्ग** - बालसंस्कार वर्गापासून गीता, उपनिषद अध्ययन वर्गापर्यंत वर्गांच्या माध्यमातून अर्थार्जनाची खूप मोठी संधी शक्य आहे.

२५) **पीडीएफ** - अगदी विविध स्तोत्रां पासून दुर्मिळ ग्रंथांपर्यंत अनेक गोष्टींचे पीडीएफ तयार करून ते अल्पदरात उपलब्ध करून देणे ही रोजगाराची खूप मोठी संधी आहे.

या आणि अशा अनेक माध्यमातून संस्कृत अभ्यासकाला रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

## Part B

## Programme : Bachelor of Arts (B.A.)

## Subject - Sanskrit Literature

| Sr. No | Subjects | Subject Code | Teaching & Learning Scheme | | | | | | | Duration of Exams Hrs. | Examination & Evaluation Scheme | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Teaching Period Per week | | | | Credits | | | | Maximum Marks | | | | | Minimum Passing | |
| | | | L | T | P | Total | Theory | Practical | Total | | Theory + M.C.Q External | Skill Enhancement Module Internal | Practical Internal | Practical External | Total Marks | Marks | Grade |
| | Semester - I | | | | | | | | | | | | | | | | |
| 1 | **Sanskrit Literature (Theory)** | 1056 | 5 | - | - | 5 | 4 | - | 4 | | 80 | 20 | | | 100 | 40 | p |
| Semester - II | | | | | | | | | | | | | | | | | |
| 2 | **Sanskrit Literature (Theory)** | 1056 | 5 | - | - | 5 | 4 | - | 4 | | 80 | 20 | | | 100 | 40 | p |
| Semester - III | | | | | | | | | | | | | | | | | |
| 3 | **Sanskrit Literature (Theory** | 1056 | 5 | - | - | 5 | 4 | - | 4 | | 80 | 20 | | | 100 | 40 | p |
| Semester - IV | | | | | | | | | | | | | | | | | |
| 4 | **Sanskrit Literature (Theory)** | 1056 | 5 | - | - | 5 | 4 | - | 4 | | 80 | 20 | | | 100 | 40 | p |
| Semester - V | | | | | | | | | | | | | | | | | |
| 5 | **Sanskrit Literature (Theory)** | 1056 | 5 | - | - | 5 | 4 | - | 4 | | 80 | 20 | | | 100 | 40 | p |
| Semester - VI | | | | | | | | | | | | | | | | | |
| 6 | **Sanskrit Literature (Theory)** | 1056 | 5 | - | - | 5 | 4 | - | 4 | | 80 | 20 | | | 100 | 40 | P |

| | |
|---|---|
| Course Title | **Sanskrit Literature** |
| Course Code | 1056 |
| Course Category: | Discipline Specific Core (DSC) |
| Type of Course: | Theory |
| No. of Credits: | Theory- 04 |
| No. of Lectures: | Theory - 75 |
| Course Assessment: | End Term: 80 Marks (University level exam)<br>SEM (Internal): 20 Marks (College level evaluation) |
| Course Objective: | १) प्रत्येक वर्षी संस्कृत भाषेतील एका नाटकाच्या अभ्यासाच्या माध्यमातून नाट्य शास्त्राचा विविधांगी अभ्यास करणे.<br>२) नीतिशतकम् या वैशिष्ट्यपूर्ण काव्याच्या आधारे संस्कृत सुभाषित वाङ्मय, त्याद्वारे संस्कृत भाषेची विविध वैशिष्ट्ये समजून घेऊन नैतिक मूल्यांचे प्रतिष्ठापन करणे.<br>३) द्वितीय आणि तृतीय वर्षात मेघदूतम् च्या माध्यमातून खंड काव्याचा अभ्यास करणे.<br>४) लघुसिद्धान्तकौमुदी या ग्रंथाच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी संस्कृत व्याकरणाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे.<br>५) प्रथम वर्षात पंच महाकाव्य द्वितीय वर्षात षट्दर्शन आणि अंतिम वर्षात संस्कृत विषयातील वैज्ञानिक संशोधकांचा परिचय करून देणे.<br>६) सर्व अभ्यासक्रम घटकांचे सूक्ष्म अध्ययन करून वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे देता येणे.<br>७) समाविष्ट कौशल्याधारित अभ्यासक्रमांच्या द्वारे कौशल्य प्राप्त करणे<br>ही या अभ्यासक्रमाची व्यापक उद्दिष्टे असतील. |
| Course Outcomes: | १) अभ्यासक्रमातील नाटक किंवा काव्यामध्ये असणाऱ्या श्लोकांचा अनुवाद करता येईल.<br>२) अभ्यासक्रमातील नाटक किंवा काव्यातील महत्त्वपूर्ण वचनांचे संदर्भासह स्पष्टीकरण करता येईल.<br>३) नाटकातील महत्त्वपूर्ण घटनांचे रसग्रहण करून सारांश सादर करता येईल.<br>४) काव्यातील विविध श्लोकांचे तौलनिक अध्ययन करून रसग्रहणात्मक सारांश सादर करता येईल.<br>५) नाटकातील पात्रांचे व्यक्तिमत्व चित्रण साकारता येईल.<br>६) नाटककाराचे जीवन, त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे योगदान, त्यांची शैली याबाबत |

| | |
|---|---|
| | विवेचन करता येईल.<br>७) व्याकरणातील सूत्रांचे सोदाहरण स्पष्टीकरण करता येईल.<br>८) पंचमहाकाव्य, षट्दर्शन, वैज्ञानिक संशोधक या विषयावर विस्तृत वाचन करून सारांश सादर करता येईल.<br>९) कौशल्य आधारित अभ्यासक्रमातील कौशल्ये अंगीकृत करता येतील. |

**Programme : Bachelor of Arts (B.A.)**

**Subject - Sanskrit Literature**

## Semester I

| Unit | Syllabus | No.of Lectures |
|---|---|---|
| I | महाकवी भास विरचित स्वप्नवासवदत्तम् | 15 |
| II | महाकवी भास विरचित स्वप्नवासवदत्तम् | 15 |
| III | महाकवी भास विरचित स्वप्नवासवदत्तम् | 15 |
| IV | लघुसिद्धान्तकौमुदी संज्ञा प्रकर | 10 |
| V | वरील चार घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न. | 05 |
| **Skill Enhancement Module** | | |
| VI | भाषाविषयक कौशल्य अभ्यासक्रम - अनुवाद कौशल्य अभ्यासक्रम स्तर १<br><br>१) अनुवाद - महत्त्व , स्वरूप, आवश्यकता.<br>२ ते ८ प्रथमा ते सप्तमी विभक्ती अनुवाद ( यात विभक्तीचे प्रत्यय, त्यांचे भाषांतर, विविध धातूंना, प्रत्ययांना असणारी विभक्तींची अपेक्षा, त्यानुसार होणारे अनुवाद या गोष्टी अपेक्षित)<br>९ ते १२ दश लकार, त्यांचे प्रयोग , त्यानुसार होणारा अनुवाद. | 15 |

**Books Recommended:**

१) स्वप्नवासवदत्तम् - डॉ. शैलजा रानडे ऋचा प्रकाशन नागपूर

२) स्वप्नवासवदत्तम् - प्राचार्य राम शेवाळकर प्रसाद प्रकाशन पुणे

३) स्वप्नवासवदत्तम् वेदप्रकाश शास्त्री चौखंबा प्रकाशन वाराणसी

४) स्वप्नवासवदत्तम् रूपनारायण त्रिपाठी हंस प्रकाशन जयपूर

५) गीर्वाण वाणी यूट्यूब चैनल वर डॉ. स्वानंद गजानन पुंड यांची ४५ भागांची मालिका

६) कौमुदी विहार भाग एक - डॉ. नीला सोमलवार कौमुदि प्रकाशन नागपूर

७) लघु सिद्धांत कौमुदी राजेंद्र शास्त्री गायकवाड निकिता प्रकाशन लातूर

**Programme : Bachelor of Arts (B.A.)**

**Subject - Sanskrit Literature**

## Semester II

| Unit | Syllabus | No.of Lectures |
|---|---|---|
| I | नीतिशतकम् अज्ञपद्धती, विद्वत्पद्धती.<br>. | 15 |
| II | नीतिशतकम् मानपद्धती, धनपद्धती. | 15 |
| III | नीतिशतकम्  दुर्जनपद्धती, सुजनपद्धती. | 15 |
| IV | पंचमहाकाव्य परिचय | 10 |
| V | वरील चार घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न. | 05 |
| **Skill Enhancement Module** | | |
| VI | भाषाविषयक कौशल्य अभ्यासक्रम  - अनुवाद कौशल्य अभ्यासक्रम स्तर २<br><br>१२ तासिका अध्यापन - ३ तासिका मूल्यमापन<br><br>१) अव्ययांचा अनुवाद<br>२) सर्वनाम अनुवाद<br>३) विशेषण विशेष्य संबंधाचा अनुवाद<br>४) संख्यावाचक शब्दांचा अनुवाद<br>५) प्रत्यय अनुवाद १ - त्वान्त, ल्यबन्त तुमन्त.<br>६) प्रत्यय अनुवाद २  -  य, तव्य, अनीय, तरतम भाव<br>७) कृदन्त / तद्धित अनुवाद<br>८) प्रयोग अनुवाद - कर्तरी, कर्मणी<br>९ ते १२)  - विविध समास परिचय. सामासिक शब्दांचा अनुवाद. | 15 |

**Books Recommended:**

१) नीतिशतकम् डॉ स्वानंद गजानन पुंड ऋचा प्रकाशन नागपूर.
२) नीतिशतकम् - डॉ. भाग्यश्री भलवतकर अथर्व प्रकाशन जळगाव.
३) नीतिशतकम् - बलवान सिंह यादव चौखंबा प्रकाशन वाराणसी.
४) गीर्वाण यूट्यूब चैनल वर डॉ. स्वानंद गजानन पुंड यांची १४० भागांची मालिका
५) संस्कृत काव्याचे पंचप्राण - के.ना. वाटवे मनोहर ग्रंथमाला पुणे
६) संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास - डॉ. विनायक करंबळेकर शारदा प्रकाशन नागपूर
७) संस्कृत साहित्याचा इतिहास डॉ. बलदेव उपाध्याय चौखंबा प्रकाशन वाराणसी